# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ४२/२०२४

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/ प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता न देण्याबाबत..**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील मा.प्राचार्य/मा.संचालक यांना कळविण्यात येते की, मा.अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अग्रेषित केलेल्या संदर्भ पत्र क्र.एचटीईडी—१३०३३/२/२०२३—एमएचटी—(टीई—४), दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करिता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता न देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करीता महाराष्ट्र राज्यात औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास संलग्नीकरण न देण्याबाबत विद्यापीठांना सूचना देण्यात याव्यात, असे फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिनांक १२/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सबब, फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाचे निर्देश विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांसदर्भात विभागीय कार्यालयाकडून आतापर्यंत प्राप्त झालेल्या तसेच यापुढे प्राप्त होणा—या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येऊ नये. तसेच फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी कळविल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास संलग्नीकरण न देण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधित विद्यापीठांना कळविण्यात यावे, असे उक्त पत्रान्वये निर्देशित केलेले आहे. (सोबत दिनांक २२/०२/२०२४ चे शासन पत्र)

त्याचप्रमाणे मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भ पत्र क्रमांक: २/एनजीसी/२०२४/९८, दिनांक २३/०२/२०२४ नुसार उपरोक्त दि.२२/०२/२०२४ चे शासन पत्र आणि फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिनांक १२/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशांनुसार शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास संलग्नीकरण देण्यात येऊ नये असे कळविलेले आहे.

सबब, मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी उपरोक्त नमूद बाबींची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

(गिरीश बेत्त)
(उपकुलसचिव, संलग्नता कक्ष)

गणेशखिंड, पुणे —४११ ००७
जावक क्र. : सीए/४९९ )
दिनांक : ०४ मार्च, २०२४ )

प्रत,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 1294
दिनांक : 26.02.2024
जावक दिनांक : 27-02-2024
विभाग : Affiliation

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल-desk2@dte.maharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/२०२४/९८

दिनांक : 23 FEB 2024

प्रति,

१.कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
दिनांक 27/02/2024
आवक क्र. 1188

२.कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

विषय: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/ प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता न देण्याबाबत.

संदर्भ: शासन पत्र क्र. HTED-१३०३३/२/२०२३-MHT-(TE-४)दि. २२ फेब्रुवारी, २०२४.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन शासन पत्र प्राप्त आहे. सदर शासन पत्रान्वयें, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दि. १२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वयें दिलेल्या निर्देशांनुसार शै.व.२०२४-२५ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था / प्रवेशक्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास संलग्नीकरण देण्यात येऊ नये. (सोबत शासन पत्र जोडले आहे.)

DR-Affiliation

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२०४०९३५
Email ID: tasbi4-hted@mah.gov.in

क्रमांक : HTED-13033/2/2023-MHT-(TE-4) दिनांक: २२ फेब्रुवारी, २०२४.

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास मान्यता न देण्याबाबत..

संदर्भ:- आपले पत्र क्र.२/एनजीसी/फार्मसी नवीन संस्था-अभ्यासक्रम मान्यता/२०२४/७५, दि.१३.०२.२०२४.

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाराष्ट्र राज्यात औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास परवानगी देण्यात येऊ नये, तसेच, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाराष्ट्र राज्यात औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच, नवीन अभ्यासक्रमास संलग्नीकरण न देण्याबाबत विद्यापीठांना सूचना देण्यात याव्यात, असे फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दि.१२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सबब, फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाचे निर्देश विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासंदर्भात विभागीय कार्यालयाकडून आतापर्यंत प्राप्त झालेल्या तसेच, यापुढे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येऊ नये,

तसेच, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी कळविल्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था/प्रवेश क्षमता वाढ तसेच नवीन अभ्यासक्रमास संलग्नीकरण न देण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधित विद्यापीठांना कळविण्यात यावे.

(शहाजहान मुलाणी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती (तांशि-४)

Scanned with ACE Scanner